# मुंबई म्युनिसिपल पेन्शनर्स असोसिएशन

सोसायटी रजिस्ट्रेशन अधिनियम १९७४ चा क्र. २९०/४ जी.बी.बी.एस.डी आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्र. २९) अन्वये दि. ३१–१२–१९७४ चा क्र. एफ ३५१० (मुंबई)

कार्यालय

जी–उत्तर महापालिका विभाग कार्यालय इमारत, खोली क्र. ९, तळमजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, प्लाझा सिनेमाच्या जवळ, दादर (प), मुंबई– ४०००२८.

दूरध्वनी : २४३९७९३३, २४३९७८००, २४३६७९७०

ई मेल :–**mmpasso739@gmail.com**

# मासिक निवृत्तीवेतन

## (Monthy Pension)

१) मासिक निवृत्तीवेतनाचे सुत्रः- निवृत्तीवेतनार्ह वेतनाच्या ५०% (निवृत्तीवेतनार्ह वेतन म्हणजे निवृत्ती पूर्वीच्या १० महिन्यात मिळाललेले सरासरी वेतन) किंवा शेवटच्या महिन्यातील मुळ वेतनाच्या ५०% (या पैकी जे लाभदायक असेल ते निवृत्तीवेतन )

२) अर्हकारी सेवाः- किमान १० वर्षे
किमान २० वर्षे स्वेच्छानिवृत्ती करीता

३) निवृत्तीवेतन परिगणना करिता फक्त मुळवेतनाच (प्रत्यक्ष घेतलेले) विचारात घेतले जाते.

४) मासिक मुळ निवृत्तीवेतनावर महागाई वाढ मिळते. महागाई वाढ पूर्ण मुळ निवृत्तीवेतनावर (अंशराशीकरणाची रक्कम विचारात न घेता.) मिळते.

५) दिनांक ०१.०१.२०१६ पासून किमान मासिक मूळ निवृत्तीवेतन रू ७५००/- प्र.मा कमाल मासिक मूळ निवृत्तीवेतन रू.१,१०,०००/- प्र.मा (दिनांक ०१.०१.२०१६ पासूनच्या उच्चतम वेतन रू.२,२०,०००/-च्या ५०%)

# मृत्यु–नि– सेवानिवृत्ती उपदान

# (D C R G)

**(अ)**१) मृत्यु–नि सेवानिवृत्ती उपदानाचे सुत्रः–शेवटचे घेतलेले मूळ वेतन x अर्हकारी सेवा सहा महिन्याच्या पटीत (जास्तीत जास्त ६६)

४

कमाल मर्यादाः– सुधारित वेतनाच्या १६ १/२ पट किंवा रू. १४,००,०००/– या पैकी जी कमी असेल ती (परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/१८दि.११.०९.२०१९)

२) अर्हकारी सेवाः– किमान ५ वर्षे सेवा आवश्यक

३) परिगणना करिता कामावर हजर असताना शेवटचे घेतलेले प्रत्यक्ष मुळवेतन फक्त विचारात घ्यावे.

४) बडतर्फ/गैरवर्तणूक/दिवाळखोर तसेच ३० वर्षाच्या सेवेपूर्वी अकार्यक्षमतेमुळे सेवानिवृत्त केल्यागेलेल्या कर्मचाऱ्यास हे उपदान मिळत नाही.

**(ब)** १) दि.०१.०१.२०१६ व तदनंतर सेवेत असताना मृत्यू झाल्यास अनुज्ञेय होणारे मृत्यू उपदान (Death Gratuity) सुत्रः– शेवटचे घेतलेले मूळ वेतन x अर्हकारी सेवा सहा महिन्याच्या पटीत (जास्तीत जास्त ६६)

२

२) पाच वर्षाच्या सेवेची अट लागू नाही. दि.०१.०१.२०१६ पासून (परिपत्रक क्र.साप्रवि/ एफजीआर/१७ दि.११.०९.२०१९)

| | अर्हकारी सेवा कालावधी | मृत्यु उपदान दर |
|---|---|---|
| १ | सेवा १ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या दुप्पट |
| २ | १ वर्षापेक्षा जास्त व ५ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या सहापट |
| ३ | ५ वर्षापेक्षा जास्त व ११ वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या १२ पट |
| ४ | ११ वर्षापेक्षा जास्त व २० वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या २० पट |
| ५ | २० वर्षापेक्षा जास्त | अर्हकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहामही कालावधीसाठी अंतिमवेतनाच्या निम्मे मात्र अंतिमवेतनाच्या ३३ पटीच्या मर्यादित |

३) मृत्यु उपदानाची कमाल मर्यादा रू.१४ लक्ष इतकी राहील.

# उपदान अधिदान अधिनियम १९७२ अन्वये उपदान (P G Act 1972)

१)उपदान अधिदान अधिनियम १९७२ अन्वये उपदानाचे सूत्रः—

$$\frac{\text{शेवटचे मुळवेतन}}{\text{२६}} + \text{महागाई भत्ता} \times \text{१५} \times \text{अर्हकारी सेवा पूर्ण वर्षामध्ये}$$

२) अर्हकारी सेवाः— अ) सेवानिवृत्ती, राजीनामा किंवा नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास पाच वर्षापेक्षा कमी नाही इतकी सलग सेवा पूर्ण केल्यावर

ब) मृत्यु किंवा असमर्थमुळे सेवा समाप्त झाल्या प्रकरणी पाच वर्षे सलग सेवा पूर्ण करणे आवश्यक नाही.

क) सहा महिन्यावरील सेवा १ वर्षे म्हणून परिगणीत करावे.

३) कमाल मर्यादाः— रू.२०,००,०००/— दि.२९.०३.२०१८ पासून प्रभावित परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/१८ दि.११.०९.२०१९

४) मृत्यु—नि—सेवानिवृत्ती उपदान किंवा उपदान अधिदान अधिनियम १९७२ नुसार उपदान यातील जे जास्त असेल ते उपदान महानगरपालिका कर्मचाऱ्यांना देय होईल.

५) उपदान अधिदान अधिनियम १९७२ नुसार अनुज्ञेय उपदान व निवृत्ती वेतन नियमानुसार अनुज्ञेय मृत्यु—नि—सेवा उपदानाची रक्कम या दोहोंमधील फरकाची रक्कम निवृत्तीवेतन धारकांना देण्यात येते.

६) महानगरपालिका माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कमंचाऱ्यांना उपदान अधिदान अधिनियम १९७२ लागू नाही. या कर्मचाऱ्यांना राज्यशासनाच्या निवृत्तीवेतन नियमामधील तरतुदीनुसार सेवाउपदान / मृत्यू उपदान अनुज्ञेय होईल.

# निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण
# (Commutation of Pension)

१) निवृत्तीवेतन अंशराशीकरण सूत्रः– (मूळ मासिक निवत्तीवेतन x ४०%) x १२ x अंशराशीकरण मुल्य (८.३७१) (8.371 is Rate as per ready recknor for 58 year age i.g.supesannuation age)

२) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीवेतन, पूर्ण सेवा निवृत्तीवेतन, स्वेच्छानिवृत्ती वेतन, भरपाई निवृत्तीवेतन, असमर्थता निवृत्तीवेतन या प्रकारच्या निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण करता येते.

३) असमर्थता निवृत्तीवेतन प्रकरणात केव्हाही अर्ज केला तरी अंशराशीकरणाकरिता वैद्यकिय परीक्षा आवश्यक आहे. इतर निवृत्ती वेतनाबाबत कर्मचाऱ्याने सवानिवृत्ती पासून एक वर्षाच्या आत अर्ज केल्यास वैद्यकिय परीक्षेची आवश्यकता नाही. मात्र वर्षानंतर अर्ज केला तर कर्मचाऱ्याला वैद्यकिय परीक्षा करणे आवश्यक आहे.

४) अंशराशीकृत निवृत्ती वेतनाची रक्कम अंशराशीकरणाच्या दिनांका पासून १५ वर्षाच्या कालावधी नंतर मुळनिवृत्तीवेतनामध्ये पूनरस्थापित करण्यात येते.

# कुटंब निवृत्तीवेतन १९६४

# (Family Pension 1964)

१) कुटुंब निवृत्तीवेतन सूत्रः– मुळ वेतनाच्या ३०% किमान मर्यादा रू.७५००/– प्रतिमास कमाल मर्यादा रू.६६०००/– प्रतिमास (दि.०१.०१.२०१६ पासूनच्या उच्चतम वेतन रू.२,२०,०००/– च्या ३०%)

२) अनुज्ञेयताः– अ) नोकरीत असताना कर्मचाऱ्यास मृत्यू आल्यास

ब) सेवानिवृत्तीनंतर, कर्मचाऱ्यास भरपाई निवृत्ती वेतन, असमर्थता निवृत्तीवेतन, पूर्ण सेवा निवृत्तीवेतन, नियतवयोमानानुसार निवृत्त झाल्यावर मिळणारे निवृत्तीवेतन, अनुकंपा निवृत्तीवेतन यातील कोणतेही निवृत्ती वेतन मिळत असेल व त्याला मृत्यू आल्यास

३) उच्चदराने निवृत्ती वेतनः–

अ) वर्कमेन्स कॉमपेन्सेशन कायदा १९२३ खाली न येणाऱ्या कर्मचाऱ्यांकरीताः– ज्या कर्मचाऱ्यांची सेवा ७ वर्षांहून कमी नाही इतकी झाली आहे त्यांना दरः– कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या ५०% किंवा नियमित दराने येणाऱ्या कुटुंब निवृत्ती वेतनाच्या दुप्पट (या पैकी जे कमी असेल त्या दराने मिळते)

ब) सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या मृत्यू दिनाच्या दुसऱ्या दिवसापासून ७ वर्षापर्यंत किंवा जिवंत असता त्याच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होण्याच्या दिवसापर्यंत यातील जो दिवस आगोदर येईल त्या दिवसापर्यंत उच्चदराने कुटुंब निवृत्ती वेतन मिळेल.

क) सेवेत असताना मृत्यू झाल्यास, मृत्यू दिनाच्या दुसऱ्या दिवसापासून १० वर्षापर्यंत उच्चदराने कुटुंबनिवृत्ती वेतन मिळेल. या करिता वयाची अट रद्द करण्यात आली आहे.

उपरोक्त ५ लाभांखेरीज सेवानिवृत्ती नंतर महापालिका कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती दिनांकाला त्यांच्या खाती शिल्लक असलेल्या अर्जित रजा (EL) व अर्धपगारी रजा (HPL) च्या रोखीकरणाचा लाभ देखील मिळतो. अर्जित रजा रोखीकरणाची उच्चत्तम मर्यादा ३०० दिवस इतकी आहे. सेवा समाप्ती नंतर अर्धवेतनी रजेचे रोखीकरण करण्याबाबतची तरतूद ही दि.०१.०१.२००६ किंवा त्यानंतर मनपा सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत बंद करण्यात आली आहे. (परिपत्रक क्र.साप्रवि /एफजीआर /१८ दि.१२.११.२०१४)

७) सेवानिवृत्त होणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्याने, सेवानिवृत्ती समयी चालू असलेल्या रजा प्रवास सहाय्याच्या २ वर्षाच्या ब्लॉक करीता, त्याला अनुज्ञेय असलेला रजा प्रवास सहाय्याचा लाभ घेतला नसल्यास, सदर लाभ त्याला सेवानिवृत्ती नंतर परंतू ब्लॉकचा कालावधी संपण्यापूर्वी संबंधित आस्थापना कार्यालयास योग्य तो अर्ज करून प्राप्त करता येतो.

प्रत्येक सेवानिवृत्तांस सेवा निवृत्ती पश्चात खालील लाभ देय आहेत.

१) मासिक निवृत्ती वेतन

२) ई मेल व्दारे निवृत्तीवेतन स्लीप

३) निवृत्तीवेतन परिगणना (Pension calcution sheet) तक्ता

४) भविष्य निर्वाह निधी

५) मृत्यू नि सेवानिवृत्ती उपदान

६) निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण

७) संचित पूर्ण पगारी / अर्ध पगारी रजेचे रोखीकरण

८) कुटुंब निवृत्तीवेतन